पुढारी

# माने पॉलिटेक्निकमधील ४११ विद्यार्थ्यांना 'कॅम्पस'मधून नोकरीची संधी : विजयसिंह माने

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

वाठार येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकमध्ये चालू वर्षी झालेल्या कॅम्पस प्लेसमेंटमधून ४११ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली. त्यापैकी सर्वाधिक २५३ विद्यार्थी हे माने पॉलिटेक्निकचे आहेत. प्रत्येक वर्षी बहुराष्ट्रीय कंपन्यात औद्योगिक क्षेत्रातील उत्कृष्ट कुशल असे अभियंते घडविण्यात आघाडी घेतल्याने माने इन्स्टिट्यूट विद्यार्थ्यांना नोकरी देण्यातही पुढे राहिले आहे, अशी माहिती संस्था अध्यक्ष व जिल्हा बँकेचे संचालक विजयसिंह माने यांनी दिली.

कॉलेजने अल्पावधीत गुणवत्तेच्या जोरावर एनबीए, आयएसओ, एमएसबीटीई मानांकन, सर्वोत्कृष्ट अवॉर्ड पटकाविले आहेत. अनेक कंपन्या नोकरी निवड मेळाव्यासाठी माने कॉलेजचा प्राधान्य देतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नोकरीची गॅरेंटी देण्यात यशस्वी होत असल्याचा आनंद वाटतो, अशी माहिती जिल्हा परषद सदस्या मनीषा माने यांनी दिली.



वाठार : येथील बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य युवराज गुरव, प्रा. सना अमिन व कर्मचारी वर्ग.

बजाज, सुलजाम एनर्जी, पियाजीको व्हेईकल, केएसपीजी ऑटोमोटिव्ह, विप्रो, टाटा टेक्नॉलॉजी, क्युबिया ऑटोमोटिव्ह, आरडीसी काँक्रिट, टाटा कन्सल्टन्सी, केपीआयटी या कंपन्यातही बहुसंख्य विद्यार्थ्यांची निवड झाली आहे, अशी माहिती प्राचार्य युवराज गुरव यांनी दिली.

यावेळी एफ. बी. अमिन, पी. टी. हसबे, एस. एन. यादव, एस. ए. लकडे, बी. आर. कुंभार, एस. एफ. अमीन, ए. बी. वारके, पी. एम. पाटील, अमोल भोसले उपस्थित होते.

Kolhapur Edition
Jun 30, 2022 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# माने पॉलिटेक्निकच्या २३ विद्यार्थ्यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची** : वाठार (ता. हातकणंगले) येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या अंतिम वर्षातील २३ विद्यार्थ्यांची वाहन निर्मितीच्या क्षेत्रातील नामवंत पियाजिओ व्हेईकल कंपनीत (बारामती) निवड झाली. विद्यार्थ्यांना उत्तम पॅकेज मिळाले आहे.

पियाजिओ कंपनीने अशोकराव माने तंत्रनिकेतन कॉलेजसोबत सामंजस्य करार केला आहे. कॉलेजने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच नोकरी मिळवून देण्यातही सदैव आघाडी ठेवली असल्याची माहिती संस्था अध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य युवराज गुरव, कॉलेजचे टिपीओ प्रा. एफ. बी. ए. अमीन, प्रा. पी. टी. हसबे, एस. ए. लकडे, एस. एन. यादव उपस्थित होते.



**वाठार येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकमधील विद्यार्थ्यांचा निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य युवराज गुरव, पी. टी. हसबे, एस. ए. लकडे, एस. एन. यादव उपस्थित होते.**

लोकमत



अशोकराव माने पोलिटेक्निकमधील विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या २५३ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** वाठार येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकमध्ये चालूवर्षी झालेल्या कॅम्पस प्लेसमेंटमधून ४११ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली. त्यापैकी सर्वाधिक २५३ विद्यार्थी हे अशोकराव माने पॉलिटेक्निकचे आहेत. प्रत्येक वर्षी बहुराष्ट्रीय कंपन्यांत औद्योगिक क्षेत्रातील उत्कृष्ट कुशल असे अभियंते घडविण्यात आघाडी घेतल्याने माने इन्स्टिट्यूट विद्यार्थ्यांना नोकरी देण्यातही पुढे राहिले आहे, अशी माहिती संस्था अध्यक्ष व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विजयसिंह माने यांनी दिली.

कॉलेजने अल्पावधीत गुणवतेच्या जोरावर एनबीए, आयएसओ, एमएसबीटीई मानांकन, सर्वोत्कृष्ट अवॉर्ड पटकाविले आहेत. अनेक कंपन्या नोकरी निवड मेळाव्यासाठी माने कॉलेजला प्राधान्य देतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नोकरीची गॅरंटी देण्यात यशस्वी होत असल्याचा आनंद वाटतो, अशी माहिती जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने यांनी दिली. कमिन्स इंडिया या बहुराष्ट्रीय कंपनीने पूल कॅम्पससाठी पहिली पसंती माने पॉलिटेक्निकला दिली आहे. बजाज, सुलजाम एनर्जी, पियाजीको व्हेईकल, केएसपीजी ऑटोमोटिव्ह, विप्रो, टाटा टेक्नॉलॉजी, क्यूबिया ऑटोमोटिव्ह, आरडीसी कॉंक्रिट, टाटा कन्सल्टन्सी, केपीआयटी या कंपन्यांतही बहुसंख्य विद्यार्थ्यांची निवड केली आहे, अशी माहिती प्राचार्य युवराज गुरव यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एफ. बी. अमिन, पी. टी. हसबे, एस. एन. यादव, एस. ए. लकडे, बी. आर. कुंभार, आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

आमचे अशिलांनी दिले माहितीवरून, दाखवले कागदपत्रांवरून व त्यांचे सूचनेप्रमाणे तमाम लोकांना कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन :** कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील ई वॉर्ड, शांतीनिकेतन शाळेसमोरील कसबा बावडा **सि.स.नं. ५४ अ / १२ प्लॉट नं. ८** याचे एकूण क्षेत्र ४९५.६ चौ.मी. असा निवासी वापराचा खुला प्लॉट असून यासी चतुःसीमा खालीलप्रमाणे : **पूर्वेस** - सि.स.नं ५४ ब ची मिळकत, **पश्चिमेस** - कॉलनी रस्ता, **दक्षिणेस** - सि.स.नं. ५४ अ /११ (प्लॉट नं.९), **उत्तरेस** -

पुढारी

# माने कॉलेजच्या नावलौकिकात वाढ

## विजयसिंह माने : माने तंत्रनिकेतनमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

दर्जेदार शिक्षणाच्या गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत सर्वोत्तम निकालात अव्वल राहत अशोकराव माने तंत्रशिक्षण कॉलेजने आपला नावलौकिक वाढला आहे. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल करियर हेच ध्येय ठेवले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हे लोकप्रिय ज्ञानदानाचे केंद्र बनले, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने यांनी व्यक्त केले.

वाठार येथील तंत्रनिकेतनमध्ये राज्य तंत्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने प्रमुख उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य वाय. आर. गुरव होते.

मनीषा माने म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी जागतिक घडामोडीवर लक्ष ठेवून सर्वच क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

यावेळी प्राचार्य वाय. आर.गुरव यांनी मार्गदर्शन केले. इलेक्ट्रिकल



**वाठार : येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षेत प्रथम पटकावलेल्या प्रियांका देवकर हिचा सत्कार करताना मनीषा माने. सोबत प्राचार्य युवराज गुरव, प्रा. सना अमिन, प्रियांका सुतार उपस्थित होते.**

विभागाची ९५.३० गुण मिळवून अंतिम वर्षाच्या परीक्षेत प्रियांका देवकर प्रथम तर प्रथम वर्षाच्या परीक्षेत देवयानी सूर्यवंशी हिने ९४.८६ टक्के गुण मिळवून प्रथम आली.

अनुक्रमे निकाल असा- इलेक्ट्रिकल : प्रियांका देवकर-९५.३० टक्के, श्रुती मराठे-८९.१० टक्के, अनविता कदम-८७.९०, ऑटोमोबाईल : प्रियांका चौगुले- ९२.६३ टक्के, ऋत्विक व्हरांबळे- ९२.५३ टक्के, प्रतीक्षा पाटील- ९२ टक्के, कॉम्प्युटर : उत्कर्ष पाटील-९२.५६ टक्के प्रणव शेटे-९१.८९ टक्के, यश पाटील-९१.३३ टक्के, मेकॅनिकल : विनय जाधव -,९१.३३ टक्के, अमित रंगनवार, स्वप्नाली मोरे- ८९.९० टक्के. इलेक्ट्रॉनिक्स : अनिकेत शिपेकर-८७.६८ टक्के, वैष्णवी पाटील- ८७.३७ टक्के, अभय शिंदे-८५.६८ टक्के. सिव्हिल : गायत्री पाटील ८७.६० टक्के, प्रणव पाटील ८६.५० टक्के, वंशिका कुंभार ८६.४० टक्के. प्रथम वर्ष- देवयानी सूर्यवंशी- ९४.८६ टक्के, निहारीका तिवारी- ९३.७१ टक्के, पवन बाबर- ९१.८६ टक्के,दीप्तेश डांगे.

My Kolhapur Edition
Apr 3, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# संकटात संधी शोधून करिअर घडवा : माने

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची** : आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असताना आपल्या कलागुणांना वाव देत आवडही जोपासली पाहिजे. प्रत्येक टप्प्यावर आत्मविश्वास बळ देतो. कितीही संकटे आली, तर त्यामध्ये संधी शोधून करिअर करा, असे आवाहन खासदार धैर्यशील माने यांनी केले.

वाठार येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक विजयसिंह माने होते. जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने, भाग्यश्री सूर्यवंशी प्रमुख उपस्थित होत्या.

खासदार माने म्हणाले, माने इन्स्टिट्यूटने अल्पावधीत उत्तुंग भरारी घेतली आहे. दर्जेदार व गुणवत्तेची चांगली शैक्षणिक परंपरा या इन्स्टिट्यूटला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या करिअरला दिशा देण्याचे काम हे इन्स्टिट्यूट करीत आहे.



वाठार येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये खासदार धैर्यशील माने यांच्या हस्ते पारितोषिक वितरण केले. यावेळी विजयसिंह माने, झाकीर भालदार, मनीषा माने, भाग्यश्री सूर्यवंशी, युवराज गुरव, एच. टी. जाधव उपस्थित होते.

विजयसिंह माने म्हणाले, विद्यार्थ्यांनी सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी स्पर्धात्मक उपक्रमात सहभाग घेतला पाहिजे. कलेची आवड जोपासत सांस्कृतिक चळवळ गतिमान केली पाहिजे. व्यक्तिमत्त्व विकासासाठी कलाविष्कार गरजेचा आहे. प्रास्ताविक प्राचार्य युवराज गुरव यांनी केले. झाकीर भालदार, संचालक एच.टी. जाधव, डॉ. एस. व्ही. पाटील, डॉ. एन. बी. चौगुले, डॉ. डी. आर. जडगे, डॉ. अभिजित कुलकर्णी उपस्थित होते.

लोकमत



वाठार येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य युवराज गुरव उपस्थित होते.

# अशोकराव माने कॉलेजच्या २१ विद्यार्थ्यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या २१ विद्यार्थ्यांची मुबिया ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट्स या बहुराष्ट्रीय कंपनीत कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड झाली. गुणवत्तेच्या जोरावर नोकरीची हमी देणारी परंपरा कॉलेजने कायम राखली. गरजेनुसार नवे बदल स्वीकारत अत्याधुनिक तंत्रप्रणालीनुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञानदान अन् मार्गदर्शन यास प्राधान्य दिल्याने शंभर टक्के नोकरीला यश मिळत आहे, अशी माहिती संस्था अध्यक्ष व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विजयसिंह माने यांनी दिली.

वाठार येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनमधील नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने होत्या. मेकॅनिकल, ऑटोमोबाइल, इलेक्ट्रिकल या विभागांतील अनुक्रमे १४, ४, ३ अशा एकूण २१ विद्यार्थ्यांचा या नियुक्तीमध्ये समावेश असल्याचे प्राचार्य युवराज गुरव यांनी सांगितले. यावेळी टीपीओ प्रा. एफ. बी. ए. अमीन, एस. एन. यादव, बी. व्ही. कुंभार, पी. टी. हसबे, एन. वाय. पाटील, एस. बी. गोरे उपस्थित होते.

पुढारी



वाठार : बजाज ऑटो, पुणे येथे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्रा. वाय. आर. गुरव, टीपीओ प्रा. एफ. बी. अमीन, प्रा. एस. एफ. अमीन, प्रा. एस. एन. यादव, प्रा. पी. टी. हसबे, प्रा. निखिल पाटील आदी.

# अशोकराव माने तंत्रनिकेतनच्या ६० विद्यार्थ्यांची बजाज कंपनीत निवड

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

वाठार येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये पदविका अभ्यास क्रम अंतिम वर्षात शिकणाऱ्या ६० विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटच्या माध्यमातून पुणे येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये निवड झाली.

कोरोना व लॉकडाऊनमुळे ऑनलाईन व नंतर ऑफलाईन या पद्धतीने चालू शैक्षणिक वर्ष उशिराने सुरू झाले असले तरी दरवर्षीप्रमाणे दर्जेदार शिक्षणासोबत नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देण्यात पुणे विभागात अशोकराव माने तंत्रनिकेतन अग्रेसर आहे. आगामी काळात अशाच प्रकारच्या नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्या येणार असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देण्याचा मानस संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने यांनी व्यक्त केला.

अशोकराव माने ग्रुपने ग्रामीण तसेच शहरी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नेहमी प्राधान्य दिले असल्याने विद्यार्थ्यांना त्यांची पहिलीच नोकरी नामांकित कंपनीत मिळवून देण्यात तंत्रनिकेतन यशस्वी होत असल्याच्या भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

या निवडीमध्ये मेकॅनिकल विभागातील - २६, ऑटोमोबाईल विभागातील - ०८, इलेक्ट्रॉनिक्स विभागातील - ०७ आणि इलेक्ट्रिकल विभागातील-१९ अशा एकूण ६० विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची माहिती तंत्रनिकेतनचे प्राचार्य वाय. आर. गुरव यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी टीपीओ. प्रा. एफ. बी. अमीन, विभाग प्रमुख एस. एफ. अमीन, प्रा. पी. टी. हसबे, प्रा. एस. एन. यादव, प्रा. बी. व्ही. कुंभार, अमोल भोसले व सर्व विभाग समन्वयक उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

आमचे अशील **सौ. शकुंतला बाबुराव चौगुले रा.मौजे हेरले ता. हातकणंगले जि.कोल्हापूर** यांनी दिले माहिती व दाखविले कागदपत्रांवरून तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, **१.मिळकतींचे वर्णन :-**

**(अ) मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५६१, क्षेत्र हे .०.२८ आर, आकार रु.३.६९ पैसेची संपूर्ण शेतमिळकत**

**(ब) मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट नं.१२१९, क्षेत्र हे.०.९६ आर, आकार रु.९.२५ पैसेची संपूर्ण शेतमिळकत**

**(क) मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट नं.१२२३, क्षेत्र हे.०.४६ आर, आकार रु.४.६२ पैसेची संपूर्ण शेतमिळकत**

**(ड) मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५५३, क्षेत्र हे.०.१४ आर, पो.ख.हे.०.०५ आर, यापैकी हे.०.०२ आर, आकार रु.०.२९ पैसेची शेतमिळकत**

## जाहीर इशारा नोटीस

**तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना व बँकांना जाहीर इशारा नोटिसीने कळविणेत येते की,**

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलांचे पूर्वहक्कदार श्री. सातगोंडा शिवगोंडा हेगाजे यांनी दि.२९/०८/२००० इ. रोजी रजि. दस्त नं. ६१६८/२००० अन्वये पुऱ्या मोबदल्यात खरेदी केलेली आहे. तेव्हापासून